**नियमित दिवाणी दावा क्रमांक ४४/२०२६.**
**श्री. सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी वि. ग्रामपंचायत जिरेवाडी व ईतर.**
**CNR No : MHBI130004642026.**

**:: निशाणी क्रमांक - ०५ ::**

वादी/ अर्जदाराने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया सहितेच्या आदेश ३९, नियम १ व २ अंतर्गत दाखल केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे आहे की --**

**०२.** श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी ता. परळी वै. जि बीड हे संस्थान नोंदणीकृत संस्थान असून, सदर संस्थानचा न्यास नोंदणी क्र. १८०७/जिल्हा बीड असा आहे. श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी या संस्थानचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून श्री प्रभाकर कुंडलिक मुंडे रा. जिरेवाडी ता. परळी वै. जि. बीड हे संस्थानचा कारभार संस्थानच्या कार्यकारी मंडळाच्या मार्फत स्वतः संस्थानचे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहून पार पाडत आहेत. श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी ही संस्थान नोंदणीकृत असल्यामुळे त्या संस्थानच्या मार्फत संस्थानचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून श्री प्रभाकर कुंडलिक मुंडे हे प्रस्तुत प्रकरण संस्थानच्या हितासाठी संस्थानच्या मार्फत दाखल करत आहेत. श्री सोमेश्वर संस्थान हे मौजे जिरेवाडी ता. परळी वै. या ठिकाणी असून सदर संस्थानचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळातील कार्यकारी सदस्य हे सर्वजण मौजे जिरेवाडी ता. परळी वै. जि. बीड येथील रहिवाशी आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ ही मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील ग्रामपंचायत असून, मौजे जिरेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच म्हणून सौ. मनिषा भ्र. गोवर्धन कांदे या मौजे ग्रामपंचायत जिरेवाडीच्या सरपंच या नात्याने कारभार पाहत आहेत. तसेच दाव्यातील प्रतिवादी क्र. २ हे मौजे ग्रामपंचायत, जिरेवाडी ता. परळी वै. चे ग्रामपंचायत अधिकारी आहेत. प्रतिवादी क्र. ३ हे ग्रामपंचायत, जिरेवाडी चे सरपंच सौ. मनिषा गोवर्धन कांदे यांचे पती असून ते सरपंच यांना ग्रामपंचायत कार्यालयाची बेकायदेशीर बांधकाम करण्यास मदत करत असल्यामुळे प्रतिवादी क्र. ३ म्हणून त्यांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे. वादी व प्रतिवादी यांचे राहण्याचे ठिकाण हे मौजे जिरेवाडी ता. परळी वै. जि. बीड येथील आहे.

**०३.** प्रस्तुत प्रकरणात श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी ता. परळी वै. ज्याचा न्यास नोंदणी क्र. १८०७/जिल्हा बीड असा असून या संस्थानची मौजे जिरेवाडी ता. परळी वै. शिवारात जमीन गट क्र. ३९७ वर्ग-२ या गट नंबर मध्ये एकुण क्षेत्रफळ ०९ हे. ६७ आर पैकी श्री सोमेश्वर संस्थानच्या मालकी हक्कातील, ताबे व उपभोगाची जमीन क्षेत्र ०८ हेक्टर ४ ६ आर ज्याचा आकार ०३ रुपये ४६ पैसे या जमीनीचे महसूल अभिलेखामध्ये मालकी, ताबा व भोगवटादार म्हणून संस्थानच्या नांवे नोंद असून, सदर जमीन गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी पैकी ०८ हेक्टर ४६ आर जमीन संस्थानच्या मालकी व ताब्याची आहे. परंतु सदर जमीन गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी यामध्ये असलेली सर्व एकुण जमीन ०९ हेक्टर ६७ आर ही जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून महसूल अभिलेखात सदर जमीनीची नोंद आहे. अशा प्रकारे जमीन गट क्र. ३९७ मधील ०८ हेक्टर ४६ आर जमीनीची मालकी, वहिती भोगवटा हे श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी मार्फत श्री सोमेश्वर संस्थानचे कार्यकारी अध्यक्ष तसेच श्री सोमेश्वर संस्थानचे कार्यकारी मंडळ सदर जमीनीची देखभाल करुन संस्थानच्या हितासाठी सदर जमीनीचा उपभोग, वापर करीत आहेत.

**०४.** मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील श्री सोमेश्वर संस्थान या संस्थानाचे “श्री सोमेश्वर मंदिर” हे मंदिर जमीन गट क्र. ३९७ मध्ये असून सदर मंदिर हे पुर्वाभिमुख गावठाणा लगत दक्षिणेकडील दिशेस आहे. श्री सोमेश्वर संस्थानचे लोकहितासाठी, वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक, नगर भोजन ईत्यादी कार्यक्रम करण्यासाठी “भगवान बाबा मंगल कार्यालय” हे कार्यालय असून सदर कार्यालयाच्या पुर्वबाजुस सदर वादी संस्थानची रिकामी जागा आहे. त्या जागेमध्ये मारोतीचे मंदिर (हनुमान मंदिर) आहे. सदर मारोती मंदिर (हनुमान मंदिर) व भगवान बाबा कार्यालय या दोन्हीच्या मध्ये मारोती मंदिराच्या चार ही दिशांना मोकळी जागा मंदिराच्या रहदारीसाठी, वापरासाठी आहे. परंतु हनुमान मंदिराच्या पश्चिमेस व भगवान बाबा मंगल कार्यालयाच्या पुर्वेस असलेल्या श्री सोमेश्वर संस्थानच्या जमीनीत जिल्हा परिषदेची पडीक शाळा आहे. श्री सोमेश्वर संस्थानच्या होणाऱ्या नगर भोजनाच्या कार्यक्रमासाठी, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी, सामाजिक कार्यासाठी संस्थानाला सदर

उल्लेखीत मोकळ्या जागेची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे श्री सोमेश्वर संस्थानच्या समोर असलेली सदरची शाळा बऱ्याच वर्षापासून बंद असून सदर शाळेची असलेली ईमारत बंद पडीत स्वरुपात आहे. सदर शाळा बंद करुन सदरची शाळा दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत केलेली आहे. त्यामुळे पुर्वीची असलेली जिल्हा परिषद शाळेची जागा ही जमीन संस्थानच्या मालकीची असल्याने, सदर जागेस वेळोवेळी संस्थानाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकता भासत असल्यामुळे त्या ठिकाणी संस्थानच्या वेगवेगळ्या समाज उपयोगी सुख-सोयी उपलब्ध करण्यासाठी सदरची जागा कोणतेही बांधकाम न करता तशीच पडीक स्वरुपात आहे. त्याच पडीक स्वरुपात असलेल्या श्री सोमेश्वर संस्थानच्या मालकीच्या जमीनीत असलेली पडीक स्वरुपाची शाळा त्या शाळेपैकी उत्तरेकडील अर्धा भाग दाव्यासोबत दाखल केलेल्या फोटो प्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी न्यासाची कोणतीही रितसर परवानगी संस्थेच्या कार्यालयाकडून घेतलली नसतांना सदर पडीक शाळेचा अर्धा भाग जबरदस्तीने जे.सी.बी. च्या साह्याने पाडून त्या जागेवर ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी मार्फत ग्रामपंचायत कार्यालयाचे बेकायदेशीर बांधकाम करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी मार्फत मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील जमीन गट क्र. ३९७ मधील असलेली संस्थानची वादग्रस्त जमीन ज्या जागेच्या चतुःसिंमा पुर्वेस - रिकामी जमीन जागा व हनुमान मंदिर मौजे जिरेवाडी, पश्चिमेस - संस्थानचे भगवान बाबा मंगल कार्यालय, दक्षिणेस - अर्धवट जुनी पडीत शाळा व उत्तरेस - पडीत जागा, या प्रमाणे श्री सोमेश्वर संस्थानच्या जमीनीवर ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी हे वरील चतुःसिमेच्या आतील अंदाजे पुर्वपश्चीम ४० फुट व दक्षिणोत्तर ४० फुट ऐवढ्या जागेवर बेकायदेशीर रित्या अतिक्रमण बेकायदेशीर बांधकाम करत आहेत. यामुळे वरील प्रमाणे वादी यांच्या मालकी ताब्याची व उपभोगाची, हक्काची व उपयोगाची असलेली जमीन गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी येथील सदर जमीन जागा व त्या जागेवरील करत असलेले बेकायदेशीर बांधकाम यापुढे या दाव्यात वादग्रस्त समजण्यात यावे.

**०५.** मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील ग्रामपंचायत कार्यालय मार्फत सरपंच सौ. मनिषा भ्र. गोवर्धन कांदे हे संस्थानच्या वरील प्रमाणे मालकी हक्काच्या जमीनीत

बेकायदेशीर रित्या श्री सोमेश्वर संस्थान मौजे जिरेवाडी या संस्थानच्या कोणत्याही पुर्वपरवानगीशिवाय संस्थानाच्या जमीन गट क्र. ३९७ मधील जमीनीत अतिक्रमण करुन बेकायदेशीर रित्या ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम करत आहेत जे चुकीचे व बेकायदेशीर आहे. सदर बांधकामास प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ व ३ यांना प्रतिवादी क्र. ३ हे संस्थानच्या जागेत अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम करण्यास मदत करीत आहेत. सदरचे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या संगणमताने करण्यात येत असलेले बेकायदेशीर बांधकाम श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी चे कार्यकारी मंडळ व कार्यकारी अध्यक्ष यांनी प्रतिवादी क्र. १ व २ हे संस्थानच्या जागेत बेकायदेशीर करत असलेले बांधकाम हे चुकीचे आहे व सदरचे बांधकाम करण्यात येऊ नये असे समजवण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रतिवादी हे आडमुठ्या स्वभावाचे असल्याने ते ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत असे वादी यांना समजल्याने श्री सोमेश्वर संस्थानचे कार्यकारी मंडळ यांनी सदरचे बेकायदेशीर बांधकाम थांबविण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष यांना कार्यकारी मंडळातील ठरावानुसार अधिकार दिलेले आहेत. याच अधिकाराचा वापर करुन संस्थेचे अध्यक्ष यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुध्द गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै. यांच्याकडे दि. ०९/०२/२०२६ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. सदर सदर तक्रारीच्या प्रती प्रतिवादी क्र. १ व २ आणि तहसिलदार, परळी वै., उपविभागीय अधिकारी, परळी वै. यांना माहितीस्तव देण्यात आलेल्या आहेत.

**०६.** श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी या संस्थानच्या जमीनीत/जागेत असेच बेकायदेशीर बांधकाम होत गेले तर श्री सोमेश्वर संस्थान देवस्थानाच्या देखभालीसाठी, भावीक भक्त गणांच्या सुख-सोयीसाठी, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सदैव अडथळा निर्माण होणार आहे. ज्यामुळे संस्थान मार्फत होत असलेले सांस्कृतिक, नगर भोजन असे वेगवेगळे कार्यक्रम करण्यास कायमस्वरुपी बेकायदेशीर बांधकामामुळे अडथळा निर्माण होणार आहे. सदर बेकायदेशीर बांधकाम होत असलेली जागा ही मंदिराच्या समोर असलेल्या भगवान बाबा मंगल कार्यालयास लगत आहे. श्री सोमेश्वर संस्थान या देवस्थानासाठी आठवड्यातून दोन ते तीन वेळेस निश्चीत नगर भोजनाचा, भजनाचा,

किर्तनाचा व असे वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम नेहमी होत असतात. श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी हे भावीक भक्ताचे श्रध्देचे व आपुलकीचे स्थान आहे. ज्यामुळे सामान्य भावीक भक्तांना सदरचे बेकायदशीर बांधकाम झाल्यास नाहक, विनाकारण रहदारीस किंवा रेलचेल करण्यास, वाहने उभे करण्यास, पार्किंगसाठी अतिशय आडथळा निर्माण होणार आहे. परंतु जर प्रतिवादींनी असेच बांधकाम बेकायदेशीरपणे वादी संस्थानच्या जागेत केले तर त्यामुळे संस्थानचे आतोनात, कधीही न भरुन निघणारे मोठे नुकसान होणार आहे. ज्याचा परिनाम भावीक भक्तांवर होऊन श्री सोमेश्वर संस्थान या देवस्थानच्या श्रध्देवर होणार आहे. ज्यामुळे संस्थानचे मोठे नुकसान होणार आहे जे कोणत्याही कारणाने भरुन निघणारे नाही. प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त जमीन ही संस्थानची निर्वीवाद जमीन असून सदर जमीनीचे सर्वसाधारण भावीकांच्या भावनेसाठी, श्रध्देसाठी, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सदर संस्थान व संस्थानची जागा सर्व सामान्य नागरीकांच्या उपभोगासाठी राहणे अत्यंत आवश्यक व न्यायाचे आहे. सदर प्रतिवादी क्र. १ ते ३ हे संगणमताने मनगटशाहीच्या बळावर वादी यांनी सदर बांधकाम वादीच्या जागेवर करु नका असे नेहमी-नेहमी सांगितले तरी प्रतिवादी यांनी वादीच्या जागेवर बांधकाम करणे सुरुच ठेवलेले आहे.

**०७.** श्री सोमेश्वर संस्थानचे अध्यक्ष यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ करीत असलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत दिनांक ०९/०२/२०२६ रोजी मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै. यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/०२/२०२६ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांना पंचायत समिती, परळी वै. मार्फत गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, परळी वै. यांनी श्री. सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांच्या मालकीच्या जमीन गट क्र. ३९७ मध्ये होत असलेल्या अनाधिकृत, बेकायदेशीर बांधकाम तात्काळ न करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ ते ३ हे आडमुठ्यापणाने सदरचे बेकायदेशीर बांधकाम करत आहेत. त्यामुळे वादी यांनी श्री सोमेश्वर संस्थानच्या हितासाठी प्रतिवादीच्या विरुध्द सदरचा दावा दाखल करण्याचे ठराव पास करुन प्रस्तुत प्रकरण प्रतिवादीच्या विरुध्द दाखल केले आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादींचे विरुध्द प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यासाठी वादी यांनी केलेला तक्रारी अर्ज दि.

०९/०२/२०२६ व त्या अनुषंगाने पंचायत समिती, परळी वै. यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना दि. १०/०२/२०२६ रोजी निर्देशीत करुन सदरचे बांधकाम तात्काळ थांबविण्या बदल कळविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी हे संस्थानच्या जागेत बेकायदेशीर बांधकाम करत आहेत. प्रतिवादी यांनी सदरचे बेकायदेशीर बांधकाम चालूच ठेवले तर वादीचे आतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादींच्या विरुध्द सदरचा दावा दाखल करण्यास कारण घडले आहे.

**०८.** प्रस्तुत वादी यांनी दाखल केलेला दावा हा प्रथमदर्शनी योग्य व न्यायाचा आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादीच्या जमीनीवर अतिक्रमण करुन बेकायदेशीर रित्या बांधकाम करत आहेत. यामुळे वादी संस्थानची ०८ हेक्टर ४६ आर जमीन प्रतिवादीच्या बेकायदेशीर बांधकामामुळे कायमस्वरुपी बाधीत होत असून प्रतिवादी यांनी वादी संस्थानची कोणतीही पुर्वपरवानगी घेतलेली नाही. वादी संस्थान यांच्या नांवे महसूल अभिलेखात गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी ता. परळी वै. या गट नंबर मधील ०८ हेक्टर ४६ आर जमीन मालकी हक्काची असल्या बाबत स्पष्टपणे ७/१२ अभिलेखात नमुद आहे. परंतु प्रतिवादी दांडगशाहिने, आडमुठ्या वृत्तीने वादीच्या जागेवर असेच बेकायदेशीर बांधकाम करत राहिले तर सदरचे बांधकाम झाल्यास वादी संस्थानचे आतोनात मोठे नुकसान होईल व ज्यामुळे जनसामान्य माणसाला संस्थानची वापरात असलेली जागा सामान्य जनतेच्या हितासाठी वापरात येणार नाही. ज्यामुळे संस्थानचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. तसेच वादी संस्थानच्या मालकीची गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील जमीन महसूल अभिलेखात स्पष्टपणे नमुद असल्याने वादी संस्थान यांना प्रस्तुत दाव्यात पुर्णपणे यशाची खात्री आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात दाव्याचा समतोल, तसेच प्रथमदर्शनी दाव्यामध्ये होत असलेले वादी संस्थानचे नुकसान या सर्व बाबीसाठी मा. न्यायालयाकडून तात्पुरता मनाई हुकुमा आदेश पारीत होणे न्याय हितासाठी आवश्यक व न्यायाचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद व त्या वादाचा न्याय निकाल होण्यासाठी बराच वेळ जात असल्यामुळे प्रतिवादी करीत असलेले बेकायदेशीर बांधकाम तात्काळ वादी यांच्या न्याय हक्कासाठी तात्काळ थांबविण्यात येणे आवश्यक व न्यायाचे आहे. म्हणून वादीचा अर्ज मंजुर

करण्यात यावा वर-प्रतिवादींना सदरचे बांधकाम करण्यास दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिबंध करण्यात यावे अशी मागनी वादी यांनी केली.

**०९.** प्रतिवादी क्र. ०१ ते ३ यांनी नि.क्र. २२ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले.

**प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ चे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे –**

**१०.** प्रतिवादी यांनी वादीचे त्यांचेविरुध्दचे संपूर्ण कथन नाकारलेले आहे. प्रतिवादींचे अधिकचे कथन असे आहे की, मौ. जिरेवाडी ता. परळी वै. येथील जमीन गट नं. ३९७ क्षेत्रफळ ९ हे. ६७ आर. ही जमीन सोमेश्वर देवस्थानच्या सेवेसाठी देवस्थानचे गोसावी पुजारी यांना शासनामार्फत बहाल करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे सदरील जमीन ही इनामदार म्हणुन गोसावी समाजातील माणसांना मिळाल्यानंतर ते या जमिनीचे इनामदार व देवस्थानचे आर्चक म्हणुन या जमिनीवर प्रत्यक्षपणे काबीज झाले व या जमिनीचा उपभोग घेऊ लागले. त्याप्रमाणे ७/१२ व इतर रेकॉर्डला त्यांचे नावची नोंद घेण्यात आली, सदरची जमीन ही इनामदार बलदेव गीर रुपगीर यांना श्री. संस्थान सोमेश्वर याच्या सेवेसाठी देण्यात आलेली असुन गावचा नमुना नं. ९ इनाम जमिनीचे पत्रक मौ. जिरेवाडी यामध्ये त्याची स्पष्टपणे इ:स. १९६८ मध्ये नोंद करण्यात आलेली आहे. तसेच मालकी रकान्यात पण संस्थान सोमेश्वर अर्चक असा अमल होवुन तो शासनाच्या हुकुम नं. १०६३ आधारे दि. २३/१०/१९३७ रोजी करण्यात आलेला आहे. तसेच या जमिनीचे इनामदार हयात आहेत व ते श्री. संस्थान सोमेश्वरची पुजा-अर्चा करीत आहेत असे नमुद करण्यात आलेले आहे. सदरील जमिनीपैकी २ एकर जमिन ही नविन वस्तीसाठी गावठाण म्हणुन लोकांना घरे बांधण्यासाठी इनामदार (अर्चक) यांना या जमिनीचा मोबदला १९५० रुपये देवुन वस्तीसाठी देण्यात आलेली आहे. व ती गावठाणमध्ये समाविष्ट करण्यात आली.

**११.** हैद्राबाद संस्थानमध्ये असणाऱ्या सर्व जमिनींच्या जायमोक्यावर प्रत्यक्ष मोजणी होवुन त्याचे खासरा पत्रक १९५४-५५ मध्ये तयार करण्यात आले. ज्यामध्ये सदरील गोसावी यांची नावे मालक म्हणुन वहितीदार म्हणुन नोंदविण्यात आलेली आहेत व खासरा पत्रक १९५४-५५ ला विशेष असे महत्व आहे. कारण ते तहसीलदार ने

जायमोक्यावर जाऊन मोजणी करुन केले आहे. त्यानंतरही ७/१२ तयार झाल्यानंतर ही जमिन संस्थान सोमेश्वर च्या सेवेसाठी अर्चक म्हणुन गोसावी समाजाच्या माणसांच्या नावे नोंदवण्यात आली व सन १९६६-६७ पर्यंत सदरील माणसांची वैयक्तिक नोंद ७/१२ उताऱ्यामध्ये घेण्यात आली. सदर जमिनीचे इनामदार शेषाबुवा पि. सज्जन बुवा, गोविंद बुवा पि. ग्याना बुवा, व बलदेव गीर पि. रुप गीर यांच्या नावाने प्रत्येकी ५ आणे ४ पै. हिस्सा (१/३) दाखवण्यात आलेला आहे: यावरुनही सदरची जमिन सदरील लोकांना सोमेश्वर मंदिराच्या सेवा करण्याबद्दल व सेवा करीत राहण्याबद्दल इनाम म्हणन देण्यात आलेली आहे व ते इनामदास असून तशा प्रकारच्या नोंदी पण स्पष्टपणे दिसतात. या जमिनीशी वादी ट्रस्ट संस्थानचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही. या जमिनीच्या नोंदी पुर्वी श्री. सोमेश्वर संस्थान अर्चक (सेवाधारी) म्हणुन चालत आलेल्या होत्या व त्या त्यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताब्याच्या आहेत.

**१२.** सदरील गट नं. ३९७ जो एकुण ९ हेक्टर ६७ आर. आहे त्यापैकी वर दर्शविल्याप्रमाणे २ एकर जमीन शासनाने इनामदारांना मावेजा (किंमत) देवून वस्तीसाठी (गावठाणसाठी) या गट नंबर मधुन दिलेली आहे. तसेच १ एकर जमीन गोसावी समाजातील लोकांना दाखवण्यात आलेली आहे. या पुर्णचा हिशोब केला तर सदरची जमीन ९ हेक्टर ६४ आर. भरते.

**१३.** गावठाण मधील जमिनीमध्ये फार पुर्वीच जिल्हा परिषद तर्फे एक शाळा ७० वर्षापूर्वी बांधण्यात आली. सदरची शाळा ही फार जुनी होवून इमारत पडण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे सदरची शाळा १२/०९/२०२५ ला स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. सदरील गावठाणच्या जागेमध्ये ज्याच्याशी या इनाम जमिनीचा संबंध नाही अशा जागेत सदरची शाळा होती तसेच तेथे ग्रामपंचायतची अंगणवाडी व सार्वजनिक पिठाची चक्की, पाणी शुध्दीकरण आर.ओ. पण बसविण्यात आलेला आहे व सर्वांच्या वेगवेगळ्या खोल्या आहेत. तसेच या जागेच्या पुर्वबाजुस मारोती (हनुमान मंदिर) मंदिर पण गावसामायीक आहे. या सर्व भागावर ग्रामपंचायतचा ताबा आहे. पुढे चालून ही शाळेची इमारत अत्यंत जुनी झाल्यामुळे

तिचे स्थलांतर करण्यात आले. या जागेवर ग्रामसभा होवून सर्व गावातर्फे असा ठराव मांडण्यात आला की या जागेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यात यावे. ग्रामपंचायत जिरेवाडी यांनी सदरच्या जुनी इमारतीचा काही भाग पाडुन त्याठिकाणी ४० बाय ४० फुट एवढ्या जागेत ग्रामपंचायतचे ऑफीस बांधण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड व इंजिनिअर यांची जुनी इमारत पाडण्याची परवानगी घेऊन त्याप्रमाणे सदरच्या शाळेच्या काही खोल्या पाडुन तेथे रितसर ग्रामपंचायतचे ऑफीस बांधण्यासाठी शासकीय निधीतून बांधकाम करण्यास सुरुवात केली. वास्तविक सदरची जागा ही गावठाणमधील असुन त्याचेशी वादी ट्रस्ट संस्थेचा अथवा इनाम जमिनीचा कोणताही हक्क संबंध नाही.

**१४.** जिरेवाडी येथील काही ग्रामस्थांनी एकत्र येवून संस्थान सोमेश्वर मंदिर या नावाशी मिळत्या जुळत्या नावाची एक ट्रस्ट संस्था १९८० मध्ये स्थापन करण्याचा विचार करून त्याप्रमाणे चॅरिटी कमिशनर बीड कडे अर्ज करुन संस्था स्थापन केली. परंतु सदरील ट्रस्ट संस्थेला या इनाम जमिनीशी कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नसतांना व सदरची जमिन हस्तांतरीत करता येत नसतांना काही अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सदरील इनामी जमिन ट्रस्टची आहे असा फार्स निर्माण केला. परंतु ही तथाकथीत संस्थाच १९८० मध्ये स्थापन झालेली असल्यामुळे तिचा अथवा संस्थान सोमेश्वर (देवस्थान) याचा या जागेशी कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही. तसेच संस्था सोमेश्वर मंदिर देवस्थान या नावाशी साधार्म्य असणाऱ्या तथाकथीत १९८० च्या ट्रस्ट संस्थेला सदरची इनाम जमिन कोणीही हस्तांतरण केली नाही, त्यांच्या ताब्यात दिली नाही व देण्याचा कोणालाही अधिकार नाही. असे असतांना वादी ट्रस्ट संस्था ही आमचीच जमिन आहे असा खोटा जयघोष करीत असते व त्याप्रमाणे त्यांनी रिव्हेन्यु अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अलिकडच्या काळात फेर क्रं. ७०८९ हा श्री. सोमेश्वर संस्थान जिरेवाडी ट्रस्ट असा फेर जुन्या श्री. सोमेश्वर संस्था अर्चक यांचे नाव कमी करुन मंजुर करुन घेतलेला आहे. वास्तविक इनामी जमिन कोणत्याही प्रकारे हस्तांतरण झालेली नाही अथवा वादी त्याचे मालक आहेत असा कोणताही दस्त त्या संस्थेच्या ताब्यात नाही व ती कायद्याने इनाम असल्याने हस्तांतरही करता येत नाही.

**१५.** इनाम जमिनी संबंधी मालकी, ताबा व इतर अन्य प्रकारे अधिकारासंबंधी चे दावे चालविण्याचा अधिकार हा अतियात कोर्टास असुन त्यांचे निकाल हे अंतिम होतात. इनाम जमिनीच्या मालकी ताब्यासंबंधी वाद निर्णित करण्याचे दिवाणी कोर्टास कोणतेही अधिकार नाहीत व अशा प्रकारचा दावा दिवाणी कोर्टात चालू शकत नाही व तो चालविण्यास प्रतिवादींचा सक्त विरोध व आक्षेप आहे.

**१६.** प्रतिवादी नं. १ ही ग्रामपंचायत, एक शासकीय संस्था असुन सदरील ग्रामपंचायत विरुध्द दावा द्यावयाचा असेल तर त्यासाठी अगोदर ग्रामपंचायतला नोटीस देणे हे बंधनकारक आहे. परंतु वादीने अशा प्रकारची कोणतीही नोटीस दिलेली नाही त्यामुळे वादीचा दावा कलम १८० ग्रामपंचायत अधिनियम प्रमाणे चालु शकत नाही.

**१७.** वादींनी गट नं. ३९७ मधील ३९७-अ व ३९७-आ याचे लोकेशन निश्चित दिलेले नाही. तसेच मुळ गावठाणला लागुन शासनाने इनामदारांना मावेजा (किंमत) देवुन त्यांची २ एकर जमिन वस्तीसाठी गावठाणला दिलेली आहे ती कोणत्या ठिकाणची आहे ? हे ही वादीने दाखवलेले नाही. वादींनी या पूर्ण जमिनीचा ३९७-अ, ३९७-आ व वस्तीसाठीची २ एकर जमिन याचा नकाशा द्यायला पाहिजे होता. त्यामुळे वादग्रस्त जागा ही गट न. ३९७ मध्ये सोमेश्वर मंदिराच्या मालकी ताब्याची नसल्यामुळे वादींचा दावा चालू शकत नाही.

**१८.** वादग्रस्त गट नं. ३९७ हा गोसावी समाजाला जे पुजा अर्चा करतात व मंदिराची देखभाल करतात त्यांना सर्व्हिस इनाम म्हणुन (मशरतुल खिदमत) दिलेली असल्यामुळे त्या लोकांनापण या दाव्यामध्ये पार्टी करणे आवश्यक होते. परंतु आवश्यक लोकांना पार्टी न केल्यामुळे वादीचा दावा सदोष असुन चालू शकत नाही.

**१९.** वादींनी वादग्रस्त गट नं. ३९७ ही सोमेश्वर देवस्थानच्या सेवेसाठी असतांना ती न दाखवता ती वादी ट्रस्टच्या मालकीची आहे व त्यांच्या ताब्यात आहे असे चुक व खोटे दाखवले आहे. तसेच पुर्वी सर्व रेकॉर्ड गोसावी समाजाच्या नावाने इनाम जमीन असतांना ते

ही कोर्टापासुन लपवून ठेवलेले आहे. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने कोर्टासमोर आलेला नाही. व अशा लपवाछपवी करणाऱ्या ट्रस्टला कोणत्याही प्रकारचा रिलिफ देता येत नाही.

**२०** वादग्रस्त जागा ही जिल्हा परिषद व ग्रामपंचायतच्या मालकीची ताब्याची असून गेल्या ७० वर्षापासुन ग्रामपंचायत स्थापन झाली तसा सदरील जागेवर ग्रामपंचायतचा मालकी नात्याने प्रत्यक्षपणे ताबा असून ग्रामपंचायत त्याचा उपभोग घेत आहे. या शाळेशिवाय या जागेमध्ये ग्रामपंचायतची अंगणवाडी व लोकांच्या सोयीसाठी सार्वजनिक पिठाची चक्की, कांडप यंत्र व पाण्याचा आर.ओ. प्लॅट असून या गोष्टीपण वादींनी दाव्यामध्ये स्पष्टपणे दर्शविलेल्या नाहीत. वादी ट्रस्ट लबाडी करुन व कोर्टाची दिशाभूल करुन आपणच मालक व काबीज असल्याचा प्रयत्न करत आहे. ग्रामपंचायत जिरेवाडी ने लोकांच्या हितासाठी केलेल्या सुविधापासुन सर्व गावकऱ्यांना त्यापासुन वंचित करण्याचा खोटा प्रयत्न करत आहेत. वादी ट्रस्ट संस्थेने स्वत:च्या नावाचा फेर क्रं. ७०८९ हा दि. १२/०९/२०२५ रोजी घेतलेला आहे. व स्वत:चे नाव खोटेपणाने या गट नं. ३९७ वर लावून घेतलेले आहे. वास्तविक इनामी जमिनीचे कोणतेही हस्तांतरण होऊ शकत नाही व वादग्रस्त शाळा व इतर जागा गावठाणात असल्याने त्यांचेबद्दल वादी ट्रस्टला दावा देता येत नाही.

**२१.** वादी ट्रस्टने इनाम जमीन त्याचे गट नं. ३९७अ, आ व शासनाने इनामदार व अर्चक यांना जमिनीची किंमत देवून २ एकर जमीन वस्तीसाठी (गावठाणसाठी) दिलेल्या जागेचे निश्चित ठिकाण (लोकेशन) दिसून येत नाही. वादीचा दावा मोघम स्वरुपाचा आहे. वादीने वरील बाबींचा लोकेशन स्पष्ट करणारा नकाशा न दिल्याने वादीचा दावा चालू शकत नाही.

**२२.** प्रतिवादी या दाव्यामध्ये वादींना दि. ०५/०३/२०२६ रोजी इन्ट्रॅागेटरीज विचारल्या होत्या. त्यामध्ये त्यांच्याकडे मालकीचा दस्त कोणता आहे, ते कधीपासुन मालक झाले, त्यांच्या पूर्वी मालक कोण होते व त्यांना कोणी हस्तांतरण केली याबाबत माहिती विचारली असतांना वादींनी कोणतीही माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही. यावरुनही वादीचे

वर्तन स्पष्ट होते. वादीने स्वत:च्या मालकी ताबा व उपभोगात कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. वादी ट्रस्ट गट नं. ३९७ इनाम जमीनीचे मालक व काबीज नव्हते व नाहीत. व ती प्रॉपर्टी १०० रुपयापेक्षा जास्त किमतीची असल्याने रजिस्ट्री कायद्याप्रमाणे तिचे रजिस्टर्ड डॉक्युमेंट शिवाय हस्तांतर झालेले नसल्यामुळे व कायद्याप्रमाणे होऊ शकत नसल्याने वादी ट्रस्टला कोणताही दावा लावण्याचा अधिकार व हक्कसंबंध नाही. ट्रस्ट अॅक्टप्रमाणे असा दावा देण्याचा त्यांना अधिकार नाही ब ती ट्रस्ट प्रॉपर्टी होऊ शकत नाही तसेच तथाकथीत वादग्रस्त जागा ही गावठाणातील ग्रामपंचायतच्या मालकी ताब्याची आहे व त्याच्याशी गट नं. ३९७ इनाम चा कोणताही संबंध नाही.

**२३.** प्रतिवादी नं १ व २ हे ग्रामपंचायतचे अध्यक्ष व ग्रामविकास अधिकारी असल्यामुळे व प्रतिवादी क्रं. १ हिचे सरपंच पद काही विरोधकांना खुपत असल्यामुळे वादी ट्रस्टने ग्रामपंचायतच्या मालकी व ताब्याच्या जागेस व शासनाच्या परवानगीने व शासकीय अनुदानातून सदरील जागेवर प्रामपंचायतची इमारत उभी राहत असल्यामुळे सदरील ग्रामपंचायतच्या सदर जागेच्या बाजुच्या ग्रामपंचायतच्या मालकीच्या अंगणवाडी, सार्वजनिक पिठाची चक्की, कांडप यंत्र व शुध्द पाण्यासाठी असणारे आर.ओ. हे प्रकल्प विकासकामे होत असल्याचे न देखवल्यामुळे मुद्दाम खोडसाळपणाने व विकासाची कामे प्रलंबीत पडावी अशा उद्देशाने जाणिवपूर्वक हा चुक व खोटा दावा दिलेला आहे. त्यामुळे न्यायाचा हिताचे होणारे नुकसान पाहता ग्रामपंचायतचे कधीही न भरुन निघाणारे नुकसान होणार आहे. तसेच न्यायाचा समतोल हा प्रतिवादींच्या बाजुने आहे त्यामुळे वादी ट्रस्टचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्जही खर्चासह खारिज आवश्यक व योग्य आहे असे कथन केले आहे.

**२४.** वादी तर्फे विधीज्ञ श्री. टी.के. गोलेर, प्रतिवादी क्र. १ व ३ तर्फे विधिज्ञ श्री. एस.टी. कराड व प्रतिवादी क्र. २ तर्फे विधिज्ञ श्री. जी.व्ही. पारेकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**२५.** वादी व प्रतिवादींचे कथन, दस्तऐवज व विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन मी खालील मुद्दे निश्चीत करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | **होय.** |
| ०२. | न्यायाचे तराजू वादीचे बाजूने आहे काय ? | **होय.** |
| ०३. | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार काय ? | **होय.** |
| ०४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

**:: का र ण मि मां सा ::**

**२६.** दावा प्रलंबित असतांना तुर्तातूर्त ताकीदीचे मागणी मंजूर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधीन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधीकार वापरतांना खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक असते. (अ) वादीला सकृतदर्शनी केस आहे का ? (ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? (क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल का?

**२७.** वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठयर्थ नि.क्र. ४ सोबत मौजे जिरेवाडी येथील गट क्र. ३९७ चा ७/१२ उतारा, तसेच सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांचे सभेची नोटीस, तसेच सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांचा ठराव क्र. ३, तसेच सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केलेली तक्रार, तसेच तहसिलदार परळी वै. यांना माहितीस्तव दिलेली तक्रार, तसेच पंचायत समिती परळी वै., यांनी प्रतिवादींना बेकायदेशिरपणे संस्थानच्या जागेत बांधकाम करण्यास मनाई केल्याचे पत्र, तसेच ग्रामपंचायत जिरेवाडी हे बेकायदेशिरपणे करत असलेल्या बांधकामाचे फाटो हे या कामी दाखल केले आहेत. प्रतिवादी यांनी नि.क्र. २० येथे ग्रामपंचायत कार्यालय जिरेवाडी यांचा असेसमेंट

उतारा मालकत्ता क्र. २ तसेच महावितरण कंपनी यांचे विदयुत बिल, तसेच जि.प. बीड बांधकाम विभाक क्र. २ यांनी दिलेले जिल्हा परिषद शाळा, मौजे जिरेवाडी येथील इमारत पाडण्याबाबतचे पत्र तसेच ग्रामसभेचा वृत्तांत, इनाम जमिनीचे पत्र नमुना-९, तसेच फेरफार पत्रकातील नक्कल क्र. ५२, तसेच फेरफार पत्रक, तसेच ७/१२ उतारा, ठराव पत्रक, खासरा पत्रक या कामी दाखल केले आहेत. तसेच नि.क्र. ३१ येथे परिशिष्ठ १ येथील सार्वजनिक ट्रस्टच्या नोंदी दाखल केल्या.

**मुद्दा क्र. ०१ करीता –**

**२८.** वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**२९.** वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी ता. परळी वै. जि बीड हे संस्थान नोंदणीकृत संस्थान असून, सदर संस्थानचा न्यास नोंदणी क्र. १८०७/जिल्हा बीड असा आहे व श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी ता. परळी वै. ज्याचा न्यास नोंदणी क्र. १८०७/जिल्हा बीड असा असून या संस्थानची मौजे जिरेवाडी ता. परळी वै. शिवारात जमीन गट क्र. ३९७ वर्ग-२ या गट नंबर मध्ये एकुण क्षेत्रफळ ०९ हे. ६७ आर पैकी श्री सोमेश्वर संस्थानच्या मालकी हक्कातील, ताबे व उपभोगाची जमीन क्षेत्र ०८ हेक्टर ४ ६ आर ज्याचा आकार ०३ रुपये ४६ पैसे या जमीनीचे महसूल अभिलेखामध्ये मालकी, ताबा व भोगवटादार म्हणून संस्थानच्या नांवे नोंद असून, सदर जमीन गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी पैकी ०८ हेक्टर ४६ आर जमीन संस्थानच्या मालकी व ताब्याची आहे. परंतु सदर जमीन गट क्र. ३९७ मौजे जिरेवाडी यामध्ये असलेली सर्व एकुण जमीन ०९ हेक्टर ६७ आर ही जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून महसूल अभिलेखात सदर जमीनीची नोंद आहे. अशा प्रकारे जमीन गट क्र. ३९७ मधील ०८ हेक्टर ४६ आर जमीनीची मालकी, वहिती भोगवटा हे श्री सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी मार्फत श्री सोमेश्वर संस्थानचे कार्यकारी अध्यक्ष तसेच श्री सोमेश्वर संस्थानचे कार्यकारी मंडळ सदर जमीनीची देखभाल करुन संस्थानच्या हितासाठी सदर जमीनीचा उपभोग, वापर करीत आहेत.

३०. मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील श्री सोमेश्वर संस्थान या संस्थानाचे "श्री सोमेश्वर मंदिर" हे मंदिर जमीन गट क्र. ३९७ मध्ये असून सदर मंदिर हे पुर्वाभिमुख गावठाणा लगत दक्षिणेकडील दिशेस आहे. श्री सोमेश्वर संस्थानचे लोकहितासाठी, वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक, नगर भोजन ईत्यादी कार्यक्रम करण्यासाठी "भगवान बाबा मंगल कार्यालय" हे कार्यालय असून सदर कार्यालयाच्या पुर्वबाजुस सदर वादी संस्थानची रिकामी जागा आहे. त्या जागेमध्ये मारोतीचे मंदिर (हनुमान मंदिर) आहे. सदर मारोती मंदिर (हनुमान मंदिर) व भगवान बाबा कार्यालय या दोन्हीच्या मध्ये मारोती मंदिराच्या चार ही दिशांना मोकळी जागा मंदिराच्या रहदारीसाठी, वापरासाठी आहे. परंतु हनुमान मंदिराच्या पश्चिमेस व भगवान बाबा मंगल कार्यालयाच्या पुर्वेस असलेल्या श्री सोमेश्वर संस्थानच्या जमीनीत जिल्हा परिषदेची पडीक शाळा आहे. श्री सोमेश्वर संस्थानच्या होणाऱ्या नगर भोजनाच्या कार्यक्रमासाठी, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी, सामाजिक कार्यासाठी संस्थानाला सदर उल्लेखीत मोकळ्या जागेची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे श्री सोमेश्वर संस्थानच्या समोर असलेली सदरची शाळा बऱ्याच वर्षापासून बंद असून सदर शाळेची असलेली ईमारत बंद पडीत स्वरुपात आहे. सदर शाळा बंद करुन सदरची शाळा दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत केलेली आहे. त्यामुळे पुर्वीची असलेली जिल्हा परिषद शाळेची जागा ही जमीन संस्थानच्या मालकीची असल्याने, सदर जागेस वेळोवेळी संस्थानाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकता भासत असल्यामुळे त्या ठिकाणी संस्थानच्या वेगवेगळ्या समाज उपयोगी सुख-सोयी उपलब्ध करण्यासाठी सदरची जागा कोणतेही बांधकाम न करता तशीच पडीक स्वरुपात आहे. त्याच पडीक स्वरुपात असलेल्या श्री सोमेश्वर संस्थानच्या मालकीच्या जमीनीत असलेली पडीक स्वरुपाची शाळा त्या शाळेपैकी उत्तरेकडील अर्धा भाग दाव्यासोबत दाखल केलेल्या फोटो प्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी न्यासाची कोणतीही रितसर परवानगी संस्थेच्या कार्यालयाकडून घेतलली नसतांना सदर पडीक शाळेचा अर्धा भाग जबरदस्तीने जे.सी.बी. च्या साह्याने पाडून त्या जागेवर ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी मार्फत ग्रामपंचायत कार्यालयाचे बेकायदेशीर बांधकाम करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी मार्फत मौजे जिरेवाडी ता. परळी वै. येथील जमीन गट क्र.

३९७ मधील असलेली संस्थानची वादग्रस्त जमीन ज्या जागेच्या चतुःसिंमा पुर्वेस - रिकामी जमीन जागा व हनुमान मंदिर मौजे जिरेवाडी, पश्चिमेस - संस्थानचे भगवान बाबा मंगल कार्यालय, दक्षिणेस - अर्धवट जुनी पडीत शाळा व उत्तरेस - पडीत जागा, या प्रमाणे श्री सोमेश्वर संस्थानच्या जमीनीवर ग्रामपंचायत कार्यालय, जिरेवाडी हे वरील चतुःसिमेच्या आतील अंदाजे पुर्वपश्चीम ४० फुट व दक्षिणोत्तर ४० फुट ऐवढ्या जागेवर बेकायदेशीर रित्या अतिक्रमण बेकायदेशीर बांधकाम करत आहेत.

**३१.** प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या युक्तीवादात असे कथन केले आहे की, गावठाण मधील जमिनीमध्ये फार पुर्वीच जिल्हा परिषद तर्फे एक शाळा ७० वर्षापूर्वी बांधण्यात आली. सदरची शाळा ही फार जुनी होवून इमारत पडण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे सदरची शाळा १२/०९/२०२५ ला स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. सदरील गावठाणच्या जागेमध्ये ज्याच्याशी या इनाम जमिनीचा संबंध नाही अशा जागेत सदरची शाळा होती तसेच तेथे ग्रामपंचायतची अंगणवाडी व सार्वजनिक पिठाची चक्की, पाणी शुध्दीकरण आर.ओ. पण बसविण्यात आलेला आहे व सर्वांच्या वेगवेगळ्या खोल्या आहेत. तसेच या जागेच्या पुर्वबाजुस मारोती (हनुमान मंदिर) मंदिर पण गावसामायीक आहे. या सर्व भागावर ग्रामपंचायतचा ताबा आहे. पुढे चालून ही शाळेची इमारत अत्यंत जुनी झाल्यामुळे तिचे स्थलांतर करण्यात आले. या जागेवर ग्रामसभा होवून सर्व गावातर्फे असा ठराव मांडण्यात आला की या जागेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यात यावे. ग्रामपंचायत जिरेवाडी यांनी सदरच्या जुनी इमारतीचा काही भाग पाडुन त्याठिकाणी ४० बाय ४० फुट एवढ्या जागेत ग्रामपंचायतचे ऑफीस बांधण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड व इंजिनिअर यांची जुनी इमारत पाडण्याची परवानगी घेऊन त्याप्रमाणे सदरच्या शाळेच्या काही खोल्या पाडुन तेथे रितसर ग्रामपंचायतचे ऑफीस बांधण्यासाठी शासकीय निधीतून बांधकाम करण्यास सुरुवात केली. वास्तविक सदरची जागा ही गावठाणमधील असुन त्याचेशी वादी ट्रस्ट संस्थेचा अथवा इनाम जमिनीचा कोणताही हक्क संबंध नाही.

**३२.** जिरेवाडी येथील काही ग्रामस्थांनी एकत्र येवून संस्थान सोमेश्वर मंदिर या नावाशी मिळत्या जुळत्या नावाची एक ट्रस्ट संस्था १९८० मध्ये स्थापन करण्याचा विचार करून त्याप्रमाणे चॅरिटी कमिशनर बीड कडे अर्ज करुन संस्था स्थापन केली. परंतु सदरील ट्रस्ट संस्थेला या इनाम जमिनीशी कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नसतांना व सदरची जमिन हस्तांतरीत करता येत नसतांना काही अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सदरील इनामी जमिन ट्रस्टची आहे असा फार्स निर्माण केला. परंतु ही तथाकथीत संस्थाच १९८० मध्ये स्थापन झालेली असल्यामुळे तिचा अथवा संस्थान सोमेश्वर (देवस्थान) याचा या जागेशी कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही. तसेच संस्था सोमेश्वर मंदिर देवस्थान या नावाशी साधार्म्य असणाऱ्या तथाकथीत १९८० च्या ट्रस्ट संस्थेला सदरची इनाम जमिन कोणीही हस्तांतरण केली नाही, त्यांच्या ताब्यात दिली नाही व देण्याचा कोणालाही अधिकार नाही. असे असतांना वादी ट्रस्ट संस्था ही आमचीच जमिन आहे असा खोटा जयघोष करीत असते व त्याप्रमाणे त्यांनी रिव्हेन्यु अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अलिकडच्या काळात फेर क्रं. ७०८९ हा श्री. सोमेश्वर संस्थान जिरेवाडी ट्रस्ट असा फेर जुन्या श्री. सोमेश्वर संस्था अर्चक यांचे नाव कमी करुन मंजुर करुन घेतलेला आहे. वास्तविक इनामी जमिन कोणत्याही प्रकारे हस्तांतरण झालेली नाही अथवा वादी त्याचे मालक आहेत असा कोणताही दस्त त्या संस्थेच्या ताब्यात नाही व ती कायद्याने इनाम असल्याने हस्तांतरही करता येत नाही असे कथन केले आहे.

**३३.** वर नमुद सर्व घटनाक्रमांचा व अभिलेखावरील दाखल कागदपत्राचा एकत्रित विचार करता दावा मिळकतीमधील असणारे गाव जिरेवाडी गट क्र. ३९७ येथे भोगवटदार सदरी श्री. सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांचे नाव असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच वादी यांनी याकामी गट विकास अधिकारी, परळी वै., यांच्याकडे अतिक्रमणाबाबत दाद मागितली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच याकामी दाखल फोटोग्राफ वरुन बांधकामास सुरवात केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी जरी नि.क. ३१ परिशिष्ठ अ, ब यामध्ये युक्तीवाद करुन असे कथन केले आहे की, सदर परिशिष्ठामध्ये सोमेश्वर संस्थान, जिरेवाडी यांच्या असणा-या मालमत्तामध्ये शाळेचे नाव नाही. मात्र

प्रथमदर्शनी पाहिले असता गट क्र. ३९७ मध्ये सोमेश्वर संस्थान जिरेवाडी यांचे नाव असल्याचे दिसून येते. तसेच आर्चक सोमेश्वर संस्थान मंदीर अथवा सोमेश्वर संस्थान ट्रस्ट याबाबत असणा-या बाबी या वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये होणा-या पुराव्यादरम्यान शाबीत होणा-या आहेत. त्यामुळे एखादी व्यक्ती आपल्या जागेत आक्रमण करत असेल तर त्यांना रोखण्याचा अधिकार हा प्रथमदर्शनी वादी यांना आहे व वादी यांनी मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्यासारखा सबळ पुरावा सादर केल्यामुळे वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली असल्याचे दिसून येते. तसेच वादी व प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेली ईतर कागदपत्रे ही वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान होणा-या अंतिम पुराव्यावेळी सिध्द होणारी कागदपत्रे आहेत असे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता –</u>**

**३४.** इतर मिळकतींमध्ये मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला आहे. जर वादी म्हणतात त्याप्रमाणे मनाई सारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला आहे. तसेच वर नमुद सर्व कारणांचा विचार करता सोयीचा समतोल हा वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द करण्यात वादी प्रथमदर्शनी यशस्वी झाले आहेत. त्यामुळे सोयीचा समतोल हा वादीच्या बाजुने दिसून येत आहे. तसेच वादी यांनी त्यांचे मिळकतीवर असणारे नाव हे प्रथमदर्शनी शाबीत केले आहे. त्याअर्थी प्रतिवादींचे विरुध्द मनाई सारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला आहे. वादी यांचे अर्जाचे अवलोकन केले असता वादी म्हणतात त्याप्रमाणे मनाई सारखी नैसर्गिक दाद वादी यांच्या हक्कात दिल्यास वादी यांचे अतोनात कसानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसून येते. मात्र सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही, कसानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. याउलट जर बांधकाम चालु राहिल्यास सदर कामी कायदेशिर गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल हा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यात वादींना यश आल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष होकारार्थी असे नोंदवण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता –**

**३५.** कायद्यान्वये प्रत्येकास आपली मालमत्ता ही उपभोगण्याचा अधिकार आहे. तसेच त्याची कायदेशीरपणे विल्हेवाट लावण्याचाही अधिकार आहे. त्यामुळे एखाद्यास कोणत्याही प्रथमदर्शनी भक्कम कारणाव्यतिरिक्त त्याच्या सदर हक्कापासुन रोखुन ठेवणे हे संयुक्तीक होणार नाही. वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली आहे. त्याबाबतच न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने दिसुन येत आहे. त्यामुळे जर तुर्तातुर्त मनाई हुकुम अर्जदाराच्या हक्कात दावा मिळकती बाबत मंजुर केला नाही तर निश्चितच अर्जदाराचे नुकसान होण्याची शक्यता ही दिसुन येते. त्यामुळे अर्जदाराने दावा मिळकत बाबत तुर्तातुर्त मनाई हुकुम त्यांच्या बाजुने मंजुर न केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे शाबित केले आहे. सबब मुद्दा क्रमांक ३ चा निष्कर्ष होकारार्थी असा नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता –**

**३६.** सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तिन्ही संज्ञा केवळ अलंकारिक भाषेचा नमुना नसुन सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा अंशतः अर्जदाराच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले आहे. त्यामुळे वादप्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी असे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा मनाई अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र. ४ च्या उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**:: आ दे श ::**

**०१.** निशाणी क्र. ०५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी यांना याद्वारे दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादी श्री सोमेश्वर संस्थान मौजे जिरेवाडी येथील जमीन गट क्र. ३९७, मधील क्षेत्र ०८ हे. ४६ आर चे काबीजदार व वहितीदार व उपभोग घेत आहेत. सदर जागेत प्रतिवादी क्र. १ व २ हे

प्रतिवादी क्र. ३ च्या मदतीने बेकायदेशीरपणे ग्रामपंचायत कार्यालयाचे करत असलेले अनाधिकृत बांधकाम वादी संस्थानच्या पुर्वपरवानगीशिवाय करत आहेत. सदरचे बांधकाम हे बेकायदेशीर असून वादीच्या जागेत बेकायदेशीर बांधकांम करण्यास प्रतिवादींना तुर्तातुर्त मनाई हुकुमाव्दारे प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

**०३.** खर्चाबद्दल कोणताही आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2026.04.08 16:24:42 +0530

दिनांक: ०८/०४/२०२६.
स्थळ : परळी वैजनाथ.

**( डी.वाय. रायरीकर )**
सहदिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर )
परळी वैजनाथ

---

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 08/04/2026.
Transcribed On : 08/04/2026.
Checked & Signed On : 08/04/2026.
Date : 08/04/2026.
Place : Parli Vaijnath.

Digitally signed by GUPTA SACHIN SATISH
Date: 2026.04.08 16:25:13 +0530

**( Sachin S. Gupta )**
Stenographer (Grade – 3)
Civil Court (Junior Division) & J.M.F.C.
Parli Vaijnath (MHBI-13)